
# अर्थात

स्मरणिका

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १७, १८, १९ नोव्हेंबर, २०१८




आयोजक

सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित

## सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (महाराष्ट्र)

प्रायोजक

Indian Council of Social Science Research

भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली

# अर्थात

स्मरणिका

## मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १७, १८, १९ नोव्हेंबर, २०१८

संपादक

**डॉ. सौ. शरयू एम. पोतनुरवार (बिडवाई)**

अर्थशास्त्र विभागप्रमुख

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

आयोजक

स्थापना वर्ष – १९७०

सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित

**सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (महाराष्ट्र)**

अर्थात स्मरणिका
मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन
**विशेषांक**
**एसटीएमजनरल ऑफ एकेडेमिक रिसर्च**
**ISSN - 2277-3908**

प्रकाशक
स्थानिक कार्याध्यक्ष
**प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले**
सर्वोदय शिक्षण मंडळ द्वारा संचालित
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (महाराष्ट्र)

प्रकाशन
सिवली पब्लिकेशन, नागपूर
शशी भोवते
मो.नं. ९८८१७१२१४९
ई-मेल : shashibhowate@gmail.com
विशेष आवृत्ती : १७ नोव्हेंबर २०१८

मुखपृष्ठ
डॉ. शरयू मनिष पोतनुरवार (बिडवाई)

अक्षर जुळवणी
वीणा दानव
सिवली ग्राफिक्स, नागपूर

- सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (महाराष्ट्र) ने आयोजित केलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशनातील शोधलेखांच्या गोषवाऱ्यांचे संकलन.
- प्रायोजक ICSSR
- या पुस्तकात व्यक्त झालेली मते त्या त्या लेखकांची आहेत. यास संस्था महाविद्यालय, प्राचार्य, संपादक, कार्यकारी संपादक, प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


- अध्यक्षीय मनोगत x
- स्थानिक कार्याध्यक्षाचे मनोगत xii
- स्थानिक कार्यवाह यांचे मनोगत xiii
- संपादकीय xv


**प्रथम सत्र – कार्ल मार्क्स – काल, आज आणि उद्या**


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्ल मार्क्स यांचा भांडवलशाही विकास सिद्धांत | डॉ. मधुकर वेदपाठक | २ |
| २) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | डॉ. टी. जी. गीते | ५ |
| ३) | कार्ल मार्क्स चे आर्थिक आणि सामाजिक विचार | डॉ. मोहन चौधरी | ७ |
| ४) | क्रांतिकारी विचारवंत कार्ल मार्क्स | प्रा. मुरलीधर गायकवाड | ११ |
| ५) | कार्ल मार्क्स वादळी विचारांचा उहापोह | प्रा. डॉ. उषा पाटील | १६ |
| ६) | कार्ल मार्क्स यांचा सामाजिक बदलांचा सिद्धांत | डॉ. विनोद मोरे | १९ |
| ७) | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार | डॉ. हिरालाल चव्हाण | २३ |
| ८) | अभिव्यक्ती कार्ल मार्क्सची अतिरिक्त मूल्य ते श्रमिक शोषण | डॉ. प्रशांत हरमकर | २५ |
| ९) | कार्ल मार्क्सचे आर्थिक तत्वज्ञान | डॉ. सुमित्रा पवार | ३२ |
| १०) | कार्ल मार्क्स यांचे अतिरिक्त मूल्य सिद्धांताचे विवेचन | डॉ. सुरेखा भिंगारदिवे | ३८ |
| ११) | शास्त्रीय समाजवादाचा जनक कार्ल मार्क्स | डॉ. रमजान मुजावर | ४१ |
| १२) | कार्ल मार्क्स भौतिकवादी अर्थतज्ज्ञ – एक सत्य . | डॉ. संजय पाटील | ४५ |
| १३) | मार्क्सवादाचे विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. रविंद्र पाटील | ४९ |
| १४) | मार्क्सच्या 'शोषण' संकल्पनेचा सैद्धांतिक आशय | प्रा. दिपक चौधरी | ५३ |
| १५) | कार्ल माक्सचे विचार सर्व समावेशक | डॉ. जे. एम. काकडे, प्रा. रविंद्र शेंडे | ५८ |
| १६) | मार्क्सच्या अतिरिक्त मूल्य सिद्धांताचे विवेचन | डॉ. संगीता टक्कामोरे | ६२ |
| १७) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | डॉ. शाहूराज मुळे, प्रा. डॉ. व्यंकट वडगावे | ६५ |
| १८) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | प्रा. सुरेश पाटील | ६८ |
| १९) | कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार आणि सद्यःस्थिती | प्रा. संजय ठिगळे | ७५ |
| २०) | कार्ल मार्क्स आणि भौतिकवाद | डॉ. रामेश्वर भिसे, डॉ. प्राजक्ता पोहरे | ७८ |
| २१) | कार्ल मार्क्स यांचे मूल्यविषयक विचार | डॉ. अनिल सत्रे | ८१ |
| २२) | कार्ल मार्क्स यांचे मानवी कल्याणकारी विचार | डॉ. सचिन कुंभारे, डॉ. राजेंद्र गव्हाळे | ८५ |
| २३) | कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या | डॉ. आस्तिक मुंगमोडे | ८८ |
| २४) | कार्ल मार्क्स व्यक्ती आणि तत्वज्ञान | नागनाथ जयवंतराव मनुरे | ९२ |

## सत्र दुसरे– कृषी मूल्य व व्यय आयोग–एक चिकित्सक अध्ययन


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कृषी मूल्य व व्यय आयोग एक चिंतन | डॉ. आर. जी. टाले, डॉ. लिलाधर खरपुरिये | ९५ |
| २) | कृषी मूल्य व व्यय आयोग एक चिकित्सा | डॉ. उत्तम वाकोडकर | ९९ |
| ३) | कृषी मूल्य आयोग : एक चिकित्सक अध्ययन | डॉ. सुरेश ढाके | १०२ |
| ४) | कृषी मूल्य आयोगाची सद्यःस्थिती एक चिकित्सक अभ्यास | डॉ. भिमराव पां. उगले | १०६ |
| ५) | शेत माल किंमत विषयक धोरणाची सद्यस्थिती | डॉ. योगेश भामरे | १११ |
| ६) | कृषी व्यय व मूल्य आयोग आणि कृषी क्षेत्र | डॉ. दिपक भुसारे, डॉ. विलास खंदारे | ११४ |
| ७) | कृषी मूल्य आयोगाची कार्ये व परिणाम – एक चिकित्सक अध्ययन | डॉ. महेंद्र गावंडे, डॉ. संजय धनवटे | ११८ |
| ८) | कृषी मूल्य व व्यय आयोग : कार्य व कामगिरी | डॉ. पंढरीनाथ कदम | १२२ |
| ९) | कृषी माल किंमत व व्यय आयोग आणि सरकारची भूमिका | प्रा. मडावी अण्णाजी, डॉ. तवार अरूण | १२५ |
| १०) | कृषी मूल्य व व्यय आयोग : एक चिकित्सक अध्ययन | डॉ. शरयू पोतनुरवार | १२८ |
| ११) | भारतातील कापसाच्या किमान आधार किंमतीचा कापूस उत्पादनावर प्रभाव | प्रा. किशोर कदम | १३२ |
| १२) | कृषी खर्च व मूल्य आयोगाच्या किंमत धोरणाची चिकित्सा | डॉ. माधव शिंदे | १४० |
| १३) | रास्त किमान आधारभूत किंमतीपासून भारतीय शेतकरी वंचित | डॉ. संजय तूपे | १४६ |


## सत्र तीसरे– महाराष्ट्रातील सामाजिक संरचनाः सद्यः स्थिती व आव्हाने


| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्रातील कुपोषण समस्या कारणे, परिणाम व उपाययोजना | डॉ. संजय भामरे | १४९ |
| २) | ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील बालमुत्युच्या घटना उद्भवलेल्या आदिवासी कुटुंबांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती | डॉ. जे. एस. इंगळे | १५५ |
| ३) | महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांक – जळगांव व बुलढाणा जिल्हयाचा तौलनिक अभ्यास | डॉ. अशोक खाचणे | १६२ |
| ४) | महाराष्ट्रातील जलयुक्त शिवार योजना – एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. करमसिंग राजपुत | १६६ |
| ५) | चाकण औद्योगिक वसाहतीमधील ॲटोमोबाईल उद्योगाचा सामाजिक रचनेवर झालेला परिणाम–एक अभ्यास | डॉ. भोकसे उमेश | १७१ |
| ६) | महिला सुरक्षितता व महाराष्ट्रातील न्याय व्यवस्था | सौ. वर्षा नेहेते, सौ. कल्पना भागवत | १७४ |
| ७) | सार्वजनिक आरोग्य आणि महाराष्ट्र | डॉ. राहुल म्होपरे | १७६ |
| ८) | महाराष्ट्रातील वित्तीय समावेशन | श्री. कमलेश विसपुते, डॉ. राजु शिंदे | १७७ |
| ९) | महाराष्ट्रातील कुपोषण समस्या, कारणे, परिणाम व उपाययोजना | प्रा. दिलीप महाजन, डॉ. राजेंद्र गव्हाळे | १८२ |
| १०) | महाराष्ट्रातील आरोग्यविषयक सद्यःस्थिती व आव्हाने | डॉ. सुभाष पाटील, सौ. तृप्ती कवळे | १८७ |
| ११) | शिक्षण – समाजोन्नतीचा स्त्रोत | प्रा. मोरेश्वर नन्नावरे, डॉ. संतोष ताडे | १९४ |

ISSN - 2277-3908

# अभिव्यक्ती कार्ल मार्क्सची–अतिरिक्त मूल्य ते श्रमिक शोषण

**डॉ. प्रशांत हरमकर**
अर्थशास्त्र विभाग, सहाय्यक प्राध्यापक,
वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि.अमरावती, आजीवन सभासद क्र. १३७९

**प्रस्तावना –**

सप्टेंबर २०१७ मध्ये कार्ल मार्क्स यांच्या 'दास कॅपिटल' या ग्रंथाला १५० वर्ष पूर्ण झालेले आहे. हा ग्रंथ हॅम्बर्ग जर्मनी येथे १८६७ रोजी प्रसिद्ध झालेला होता. हा ग्रंथ जर्मन भाषेमध्ये होता. दास कॅपिटलच्या खंड–१ चे इंग्रजी भाषांतरण १८८७ मध्ये प्रसिद्ध झाले. पहिल्या विदेशी भाषा म्हणून रशियन भाषेत १८७२ मध्ये प्रसिद्ध झाला. दास कॅपिटल हा ग्रंथ राजकीय अर्थशास्त्र आणि सामाजिक शास्त्राच्या अंतर्भाव यावर आधारलेला आहे. मार्क्सने भांडवलशाही विकासाची प्रक्रिया भौतिकवादी विवादातून (Materialist Dialectics) सांगितली आहे. मार्क्सच्या विश्लेषणाचे हे उपयोजन होते. यांमधून देशांचे शोषण जागतीक भांडवलशाही व्यवस्थेत कसे घडून येते यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे.

दास कॅपिटल तीन खंडामध्ये प्रसिद्ध झाले आहे. पहिला खंड मार्क्सच्या हयातीत १८६७ मध्ये प्रकाशित झला. ह्याची दुसरी आवृत्ती १८७२ मध्ये प्रसिद्ध झाली. मार्क्सच्या मृत्यूनंतर त्याचे घनिष्ठ मित्र फ्रेन्डरिक एंगल्सने खंड–२ हा १८८५ मध्ये प्रसिद्ध केला. तर खंड–३ हा १८९४ मध्ये प्रसिद्ध झाला. दास कॅपिटलच्या विश्लेषणाचा गाभा भांडवल होता. यामध्ये भांडवलशाही व्यवस्थेचे स्तर स्पष्ट केले होते. तर काही नव्याने संकल्पना मांडल्या होत्या. ही संकल्पनात्मक उपकरणे मार्क्सची अर्थशास्त्राला देणगी आहे. यामध्ये अतिरिक्त मूल्य, अतिरिक्त मूल्याचा दर किंवा शोषणाचा दर, भांडवलाचे मूलभूत घटक, नयाचा दर, अतिरिक्त लोकसंख्या आणि बेरोजगारांची राखीव फौज या संकल्पना विशेष महत्त्वाच्या मानल्या जातात. मार्क्सने भांडवलशाही व्यवस्थेतील विरोधाभासांचा वेध घेतला आहे. मार्क्सच्या सैद्धांतिक विश्लेषणामध्ये श्रमिकाचा शोषण सिद्धांत महत्त्वाचा मानला जातो. मार्क्सच्या पूर्वी शोषणाचे विश्लेषण से.–सिमो, सिसमॉदी, विल्यम थॉमसन्स, थॉमस हॉकिन्स, किग्जले, रॉबर्ट आवेन आणि रिकार्डोने केले होते. पण मार्क्सचे वेगळेपण म्हणजे त्याने सुत्रबद्ध पद्धतीने भांडवलशाही व्यवस्थेत श्रमिकांचे शोषण कसे घडून येते ह्याची मांडणी केलेली आहे. यापूर्वी अशा पद्धतीने कोणीही मांडणी केल्याचे दिसून येत नाही. म्हणून मार्क्सच्या श्रमिक शोषणाच्या विश्लेषणाला विशेष स्थान आहे. श्रमिकांच्या शोषणाच्या गर्भितार्थ अतिरिक्त मूल्यामध्ये दडलेला आहे. ह्याचे विवेचन मार्क्सने केलेले आहे.

**निर्मिती अतिरिक्त मूल्याची –**

कार्ल मार्क्सची अतिरिक्त मूल्याची संकल्पना भांडवलशाही व्यवस्थेच्या विकासाचा गाभा आहे. अतिरिक्त मूल्य हे श्रममूल्यावर आधारलेले असते. श्रमाचा विचार म्हणजे श्रमशक्तीचा विचार होय. उत्पादन प्रक्रियेमध्ये श्रमाचा विचार होत नसून श्रमशक्तीचा विचार होतो. मार्क्सने श्रमशक्तीचा विचार करीत असताना कौशल्य वगळले आहे. म्हणजेच मार्क्सने केवळ अकुशल श्रमिकांचा विचार अतिरिक्त मूल्याच्या संकल्पनेमध्ये केलेला आहे. अशा अकुशल श्रमिकांना मार्क्स अविभेदित श्रम (Undiffernitiated labour) असे म्हणतो. यंत्रे, इमारती इत्यादी स्थिर भांडवलाच्या जोडिला श्रम सहाय्यक असतात. श्रमिकांचे मूल्य हे श्रमिकांच्या राहणीमानाचा दर्जा, जीवनावश्यक वस्तू आणि कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याचा खर्च यावरून ठरतो.

भांडवलदार वर्ग हा भांडवल व इतर उत्पादन घटाकच्या सहाय्याने वस्तूचे उत्पादन करीत असतो. वस्तूच्या उत्पादनातून वस्तूची विक्री होते. विक्री उत्पनातून उत्पादन खर्च वजा केला तर त्यामधून जे जास्तीचे उत्पन्न प्राप्त होते त्याला अतिरिक्त मूल्य असे मार्क्सने म्हटले आहे. उत्पादन प्रक्रियेत कच्चा मालामध्ये स्वतचे मूल्य वाढवून घेण्याची क्षमता नसते. कच्चा माल व स्थिर भांडवलाच्या सहाय्याने श्रमिक अधिक उत्पादन करू शकतात. म्हणून यंत्रांना उत्पादक म्हटले आहे. ह्यालाच यंत्राची भौतिक उत्पादकता म्हटले आहे. दीर्घकाळात उत्पादन प्रक्रियेमध्ये यंत्रे झिजतात. उत्पादन प्रक्रियेत यंत्राची घडून

 ISSN - 2277-3908

येणारी झीज म्हणजे यंत्रे स्वतचे उत्पादित मूल्य-वस्तूमध्ये रूपांतरीत करीत असतात. यंत्राचा हा घसारा खर्च वस्तूच्या विक्रीतून प्रतिवर्ष कपात केल्या जातो. अंतिमत यंत्राचे आयुष्यमान संपते व यंत्राचे मूल्य शून्य होते. यंत्रासारखे स्थिर भांडवल घसारा मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करू शकत नाही. यामुळे भूमी, भांडवल, संघटक व श्रम यापैकी श्रमच असा एकमेव घटक आहे जो अतिरिक्त मूल्य निर्माण करू शकतो असे कार्ल मार्क्सचे मत आहे.

श्रमशक्तीची खरेदी भांडवलदार वर्ग करीत असतो. श्रमिकांना जीवन निर्वाहापुरते वेतन दिल्या जाते. समजा एखाद्या श्रमिकाला ८ तासाऐवजी ६ तासांचे वेतन दिल्या जाते. म्हणजे उरलेल्या २ तासाचा श्रमिकाचा मोबदला दिला जात नाही. मात्र श्रमिक ८ तासाचे काम करतो व उत्पादन करीत असतो. मिळालेल्या वेतनापेक्षा केलेले उत्पादन जास्त असते म्हणजे ते निर्माण झालेले अतिरिक्त मूल्य असते. म्हणजेच श्रमिकाने केलेल्या एकूण कामातून निर्माण झालेले ते उत्पादन मूल्य आहे. हे निर्माण झालेले अतिरिक्त मूल्य भांडवलदार वर्गाकडे जाते. विनामूल्य मिळणारे हे अतिरिक्त मूल्य वाढविण्याचा प्रयत्न भांडवलदार वर्ग करीत असतो. म्हणून मार्क्स असे म्हणतो की, भांडवलदाराचा उद्देशच अतिरिक्त मूल्य वाढविणे असतो.

**भांडवली चक्र :-**

अतिरिक्त मूल्याची गती कशी वाढत जाते? अतिरिक्त मूल्याचे स्त्रोत कोणते आहे? दास कॅपिटलच्या पहिल्या खंडामध्ये मार्क्सने असे म्हटले आहे की, प्रत्येक मूल्याचा विनिमय होतो. जो समान श्रेणीचा विनिमय असतो. जर असमान विनिमय घडून आला तर एकाच पक्षाला लाभ मिळतो तर इतर पक्षाशी विनिमय घडून हानी पोहोचते. त्यामुळे घडून आलेला विनिमय सषक्त होऊ शकत नाही. म्हणून अतिरिक्त मूल्याची निर्मिती कशी होते ह्याचा विचार महत्त्वाचा ठरतो. मार्क्सने हा विचार समग्र भांडवलशाही व्यवस्थेच्या पातळीवर केला आहे.

भांडवलाचे सुत्र हे सामान्यपणे परताव्याचे सुत्र (M-C-M') सुत्र आहे. पहिल्या अवस्थेमध्ये सुत्राची कृती विनिमयाची (M-C) आहे. ह्याचा संबंध केवळ समान विनिमयाशी आहे. या अवस्थेमध्ये अतिरिक्त मूल्य निर्माण होत नाही. दुसरी अवस्था (C-M') समान विनिमयाच्या कृतीचा आहे. तरीदेखील या अवस्थेमध्ये अतिरिक्त मूल्य निर्माण होत नाही. यावरून अतिरिक्त मूल्याच्या बाबत अटळ असा निष्कर्ष निघतो की, दोन अवस्थांमधील अभिसरण प्रक्रियेमध्ये अतिरिक्त मूल्य निर्माण होते. ह्यालाच भांडवलाचे सामान्य समीकरण असे म्हणतात. या दोन्ही अवस्था उत्पादन प्रक्रियेमध्ये स्थायी झालेल्या आहे. म्हणून अतिरिक्त मूल्याची निर्मिती समजून घेताना अभिसरणाची मर्यादा आणि भांडवली पेढ्यच्या वस्तू उत्पादन प्रक्रियेचे अध्ययन महत्त्वाचे ठरते.

भांडवलाच्या सुत्राच्या दोन अवस्था आहे. पहिल्या अवस्थेत भांडवलाच्या (M-C-C'-M') म्हणून प्रस्तुत केल्या जाते. वास्तवात वस्तूची विक्री पहिल्या अवस्थेमध्ये होत असते. ज्याला c म्हटले आहे. वस्तूच्या विक्री पासून भिन्नता दुसऱ्या अवस्थेमध्ये आहे. ज्याला C' म्हटले आहे. याशिवाय परिमाणात्मक भिन्नता C आणि C' मध्ये आहे समान विनिमयाच्या स्थितीत अतिरिक्त मूल्य निर्माण होऊ शकत नाही. कारण समान वस्तू C आहे. ज्यामध्ये मूल्याच्या दोन भिन्न श्रेणी असू शकत नाही. एक खरेदी केल्या गेलेले व दुसरे विक्री केल्या गेलेले उच्चतम मूल्य होय. मात्र C आणि C' ची ओळख भिन्न वस्तू म्हणून आहे. M-C-C'-M' च्या शेवटाला समान विनिमय घडू शकतो. येथे अतिरिक्त मूल्य निर्माण होण्याची संभाव्यता राहते. कारण C' हे मूल्य C पेक्षा जास्त आहे. C' चे मूल्य C पेक्षा जास्त कसे राहू शकते. सुत्राचा विस्तार घडून येत असताना दुसऱ्या अवस्थेमध्ये उत्पादनाची प्रक्रिया घडून येते. M-C-C'-M' यामध्येच अतिरिक्त मूल्य दडलेले आहे. जसे की,

MC {LP, MP} - (P) - - - C' - - - - M'

येथे P हे सुत्राचे नवीन तल आहे. ह्याचा संबंध उत्पादन प्रक्रियेशी आहे. शिवाय P या चलाचा संबंध प्रत्यक्षातील वस्तूच्या उत्पादनाशी आहे. ह्याच्या मूळाशी प्रकाश टाकला तर अभिसरण प्रक्रिया घडून येते.

भांडवलाच्या सामान्य सुत्राचा विस्तार होत असताना त्याचा संदर्भ भांडवलाच्या अभिसरणाशी आहे. याद्वारे औद्योगिक भांडवलाच्या एककाचे विश्लेषण वैशिष्ट्यपूर्णरित्या प्रस्तुत केलेले आहे. त्याचबरोबर भांडवली पेढीच्या संघटनांचे विश्लेषण केलेले आहे. संपूर्ण भांडवली व्यवस्था वस्तू

 ISSN - 2277-3908

उत्पादनामध्ये गुंतलेली आहे. C' चे मूल्य C पेक्षा जास्त आहे याद्वारे काय प्रस्तुत केल्या जाते. C हा वस्तू समूहाला प्रस्तुत करतो ज्याची खरेदी भांडवली पेढी करते. C' ची पेढीद्वारे विक्री केल्या जाते म्हणून C पेक्षा C' जास्त राहतो. अशा प्रकारे भांडवलाच्या अभिसरण प्रक्रियेतून अतिरिक्त मूल्य कसे निर्माण होते ते स्पष्ट होते. ह्यातून भांडवलाचा प्रवाह अधोरेखीत होतो.

भांडवलदार मुद्रेच्या बेरजेसह आरंभ करतो. वस्तू समूहाच्या खरेदीद्वारे बाजारात प्रवेश होतो. ज्याला C म्हणतात. कच्चा माल, यंत्रे, वीज, इंधन इत्यादींचा समावेश असलेला पहिला MP होय. दुसरा म्हणजे श्रमशक्ती असलेला LP होय. उत्पादनाचे आदान म्हणजे श्रम होय. C चे मूल्य MP आणि LP शी समान आहे. वस्तूचा समूह विक्री होऊन संपूण जातो तेव्हा त्याचे रूपांतरण C' मध्ये होते. या स्त्रोताद्वारे मूल्य दिसू शकते. MP द्वारे मूल्य परिवर्तीत होत राहते. ज्याचा उपयोग उत्पादनामध्ये होत राहतो. श्रमावरील खर्च मूल्यामध्ये समाविष्ट होतो. तरीदेखील MP च्या मूल्यामध्ये बदल होऊन उत्पादन संपते. यावरून असा निष्कर्ष निघतो की, मूल्यामधील वाढीचे स्त्रोत अतिरिक्त मूल्य आहे. वस्तू श्रमाधारीत (LP) असू शकतात. LP चा संबंध श्रमाधिष्ठित वस्तूशी आहे. जो की, श्रमिकांच्या कार्य पात्रतेशी त्याचा संबंध आहे. जसे कामगाराचे श्रम परिणाम श्रमिक व वस्तूचा उपयोग देखील आहे. प्रत्यक्षात उत्पादनामध्ये मानवी उर्जेवर खर्च होत असतो. ह्यातून श्रमिक मूल्य निर्माण होत असते.

येथेच अतिरिक्त मूल्याची गोपनीयता दडलेली आहे. श्रमशक्तीला मूल्य देऊन भांडवलदार वर्ग श्रम खरेदी करीत असतो. श्रमशक्तीचा वापर उत्पादन कार्यामध्ये केला जात असतो. श्रमिक उत्पादनामध्ये कच्च्या मालासह कार्य करीत असतो. श्रमिक वाढल्यामुळे मूल्यवर्धन घडून येत असते. शिवाय हा अतिरिक्त मूल्य निर्माण करण्याचा मार्ग आहे. श्रमशक्तीमुळे जे मूल्यवर्धन घडून येते ते श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षा जास्त असते. मूल्यवर्धनाचा अर्थ काय असू शकतो? श्रमशक्तीच्या उपयोगापेक्षा श्रमशक्तीचे मूल्य जास्त आहे का? याबबत काळजीपूर्वक विचार करण्याची गरज आहे. मात्र श्रमिकशक्तीतून अद्वितीय वस्तूचे मूल्य निर्माण होते.

**श्रममूल्य –**

कामगार श्रमशक्ती एककाची विक्री करीत असतात. बाजारामधील श्रमाची किंमत म्हणजे वेतनदर होय. वेतनदर पैशामध्ये प्राप्त होतात. म्हणजेच पैशाद्वारे श्रमशक्ती एककाची खरेदी होते. वेतन दर श्रमिक काळाच्या मौद्रिक प्रस्तुतेद्वारे (Monetary Expression of Labour Time) व्यक्त केल्या जाते. श्रमशक्तीचा प्रत्येक तास समान सामाजिक श्रमकाळ असतो. समजा श्रमिकाचे दररोजचे कामाचे ८ जास आहे. याकरिता त्याला दर दिवसाला ४० रूपये वेतन मिळते तर प्रतितास श्रमशक्तीचा दर ५ रूपये आहे. सामाजिक श्रम तासाची श्रमिक काळ मौद्रिक प्रस्तुतता १० रूपये आहे. तर श्रमशक्तीचे मूल्य ०.५ आहे. जो श्रमशक्तीचा प्रतितास सामाजिक श्रमतास

०.५ श्रमाच्या प्रतितासाला प्रतिसाद मिळत आहे. कामगारांना ०.५ तासाप्रमाणे परतावा सामाजिक श्रम तासामध्ये मिळतो. तासाप्रमाणे वेतन दर दिले जातात. ड्युकॅन फालीच्या नुसार श्रमशक्तीच्या प्रत्येक एककाची समानता सामाजिक श्रम काळाच्या समान आहे. यावरून श्रमशक्तीचे मूल्य स्पष्ट होते. वेतन दर आणि श्रमिक काळाची प्रस्तुतता ह्याच्या अनुपाताचे मापण श्रमशक्ती मूल्य दर्शवू शकते.

भांडवलशाही व्यवस्था वर्धनक्षम करण्यासाठी अतिरिक्त मूल्य निर्माण केल्या जाते. श्रमशक्तीचे मूल्य १ पेक्षा कमी असते का? श्रमकाळाची मौद्रिक प्रस्तुतता आणि वेतनदर अनुपातामध्ये श्रमशक्तीचे मूल्य आहे. सामाजिक श्रमाच्या प्रती तासाच्या मौद्रिक प्रस्तुतीकरणालाच श्रमिक काळाची मौद्रिक प्रस्तुतता (MELT) असे संबोधले आहे. श्रमशक्तीच्या मूल्याच्या अनुपातामध्ये १) वेतनदराच्या समान सामाजिक श्रमाचे मूल्य आहे. २) सामाजिक श्रमाच्या एका तासाचा उपयोग मूल्य निर्मितीकरिता होतो. अतिरिक्त मूल्याच्या अनुपाताचा मूल्यात्मक आणि संख्यात्मक भेदक करता येतो. जर श्रमशक्तीचा मूल्य अनुपात १ पेक्षा कमी असेल तर अतिरिक्त मूल्य निर्माण होऊ शकते. सामाजिक श्रमाच्या एका तासाद्वारे मूल्यवर्धन घडून येते. जो की, श्रममूल्यांपेक्षा जास्त असते. श्रमशक्तीची दर तासाला विक्री होत असते. वेतनाचे दर सामाजिक श्रम काळ समान असते. मात्र मूल्यापेक्षा वेतन दर कमी असतात. यामधून अंतिमत: निष्कर्ष असा निघतो की, अतिरिक्त मूल्य श्रमिक वर्गाचे शोषण घडवून आणते.

 ISSN - 2277-3908

भांडवलदार वर्गाच्या उत्पन्नाचे स्त्रोत अतिरिक्त मूल्याचे अस्तित्त्व आहे. यामधून विविध परिणाम घडून येतात. ज्याला मार्क्सने सचित्रपणे स्पष्ट केलेले आहे. भांडवलाचे आकरमान वाढत असताना एका कामाच्या दिवसाबाबत भांडवलशाही व्यवस्थेमध्ये उत्पादक कामगारांच्या एकूण श्रम काळाएवढा असतो. मार्क्सने नमूद केले आहे की, आपण कामाच्या दिवसाचे दोन भागांमध्ये विभाजन करतो. पहिल्या भागामध्ये कामाचे दिवस विभागले आहे. वेतनाचे मूल्य कामागार वर्गाच्या कामातून पुर्नरूत्पादित होते. उत्पादीत केलेल्या वस्तूंचा उपभोग वेतन उत्पन्नावर अवलंबून असतो. तरीदेखील या विभागणीला देय श्रमिक कालावधीचे कार्यकारी दिवस असे म्हणतात. श्रमिकाचा या कालावधीशी संबंध असतो. कार्यकारी दिवसाची विभागणी करताना कामगार वर्ग स्वत:साठी काम न करता भांडवलदार वर्गासाठी काम करीत असतो. भांडवलदार वर्गाच्या उत्पन्न प्रवाहाचे प्राथमिक स्त्रोत कामगार वर्गाच्या कार्यातून निर्माण होते. ज्याला अतिरिक्त मूल्य म्हटल्या जाते. ह्याला कार्यकारी दिवसाचे अदेयक श्रमवेळ (Unpaid labour time) असे म्हणता येते. श्रमाचा संबंध या कालावधीषी आहे. ह्यातून अतिरिक्त श्रम निर्माण होतात. प्रत्यक्षात अतिरिक्त श्रम विपुल प्रमाणात अस्तित्त्वात असतात. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये श्रमाच्या विपुलतेतून कामगार वर्गाचे शोषण घडून येते. भांडवलदार वर्ग श्रमिकांची पिळवणूक करून अतिरिक्त मूल्याच्या स्वरूपात खंडणी वसुल करीत असतो. जसे सरंजामशाही व्यवस्थेमध्ये दास आणि गुलामांचे शोषण घडून येत होते.

निरपेक्ष व सापेक्ष अतिरिक्त मूल्य आणि शोषणाचा दर-

अतिरिक्त मूल्यामध्ये वाढ दोन प्रकारे घडून येते. समजा वेतनाचे दर तेवढेच ठेवून कामाचे तास वाढविले तर त्यास अतिरिक्त मूल्यात होणारी निरपेक्ष वाढ असे म्हणतात. जेव्हा कामाचे तास तेवढेच ठेवून श्रमिकांच्या उत्पादकतेत वाढ केली जाते मात्र उत्पादकतेपेक्षा कमी मूल्य दिल्या जाते त्याला सापेक्ष वाढ असे म्हणतात. समजा श्रमिक त्याच्या वेतनाएवढ्य मूल्याचे काम करतो परंतु त्याला ८ तासापैकी ५ तासाचे मूल्य दिल्या जाते. उरलेल्या ३ तासाचे मूल्य अतिरिक्त होईल. ह्यालाच सापेक्ष अतिरिक्त मूल्य म्हणतात. कोणत्याही श्रमिकाला त्याच्या एकूण कामाच्या तासापेक्षा कमी तासाचे मूल्य दिल्या जात असेल तर त्याला सापेक्ष मूल्यामध्ये वाढ असे म्हणतात.

कार्लमार्क्स उत्पादनातून निर्माण होणाऱ्या मूल्याचे तीन भागांमध्ये विभाजन करतो. पहिल्या भागामध्ये यंत्रे, कच्चा माल इत्यादी घटकांचा समावेश होतो. ह्यांचे मूल्य उत्पादन प्रक्रिया सुरू असतांना स्थिर राहते. म्हणून याला स्थिर भांडवल (C) असे म्हणतात. दुसऱ्या भागामध्ये श्रममूल्याचा समावेश होतो. कारण श्रमिक स्वत:ला मिळणाऱ्या वेतनाएवढे उत्पादन करीत असतो. पण ह्यापेक्षा जास्त अतिरिक्त मूल्य निर्माण करतो. म्हणून श्रमिकाच्या वेतनास बदलते भांडवल (V) असे म्हणतात. तिसरा भाग अतिरिक्त मूल्याचा आहे. ज्याला (S) असे संबोधले आहे. या तीन भागाच्या मूल्याची बेरीज केली म्हणजे एकूण मूल्य प्राप्त होते.

$$\text{Total Value} = C + V + S$$
$$= 40 + 40 + 40$$
$$= 120$$

या समीकरणाला मार्क्सच्या मूल्य विवेचनाचा गाभा असे म्हटल्या जाते. ह्यातून इतर समीकरणाची उत्पत्ती झालेली आहे. अतिरिक्त मूल्याचा दर उत्पादन प्रक्रियेत शोषण मोजण्याचे महत्त्वाचे साधन आहे. अतिरिक्त मूल्याचा दर हा अतिरिक्त मूल्य व बदलत्या भांडवलाच्या अनुपातावरून प्राप्त होता.

$$S' = \frac{S}{V}$$

S' हा अतिरिक्त मूल्याचा दर आहे. S म्हणजे अतिरिक्त मूल्य आहे. तर V म्हणजे बदलते भांडवल आहे.

$$S' = \frac{40}{40}$$

वरील समीकरणावरून अतिरिक्त मूल्याचा दर १ प्राप्त होतो. मार्क्सच्या नुसार श्रमिकांना जेवढ्य तासाचे मूल्य तेथून वेतन म्हणून दिल्या जाते तेवढ्य तासांना आवश्यक श्रम म्हणावे. तर जेवढे तास श्रमिक अतिरिक्त मूल्य निर्माण करतो ह्याला अतिरिक्त श्रम म्हणावे. यावरून अतिरिक्त मूल्य किंवा शोषणाचा दर सांगता येतो.

$$\text{Exploitation Rate} = \frac{S}{V}$$
$$= १००\%$$

किंवा दर तासाला १० रू. मूल्य निर्माण होते.

 ISSN - 2277-3908

$= \frac{S}{V}$

$= \frac{40^{o}.}{40^{o}.}$

= 10 %.

मार्क्सच्या नुसार दोन्ही ठिकाणी अतिरिक्त मूल्याचा दर किंवा शोषणाचा दर आहे. मार्क्स म्हणतो की, शोषणाचा दर ही संकल्पना शोषक समाजाला लागू करावी. भांडवलशाही व्यवस्थेत शोषणावर भर असतो. मुद्रा, भांडवल आणि नफा याला यामध्ये विशेष महत्त्व असते.

**अतिरिक्त मूल्याचे घटक –**

अतिरिक्त मूल्य निर्मितीचे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे व्याज आणि नफा होय. शोषण सिद्धांतर्गत ह्या दोन घटकाचा विचार होणे आवश्यक आहे.

**१) व्याज –**

एकूण मूल्यातून (C+V+S) स्थिर भांडवलाचे मूल्य वगळणे तर दोन प्रकारची मूल्य शिल्लक राहतात. यापैकी एक म्हणजे चल भांडवल होय. जो की, श्रमिकांना वेतनाच्या स्वरूपात दिले जाते. दुसरे अतिरिक्त मूल्य होय. मार्क्सने खंड व व्याज यांना स्वतंत्र घटक न मानता अतिरिक्त मूल्याचे घटक मानले आहे. मार्क्सच्या नुसार मुद्रा दोन अर्थाने भांडवल मानली जाते. धनको व्याजाच्या रक्कमेइतकी रक्कम वाढवून देईल असे मानतो. तर ऋणको अथवा उत्पादकांमध्ये अतिरिक्त मूल्य मिळवून देण्याची क्षमता असते. म्हणून त्याला भांडवल म्हणतो. जे वित्तीय भांडवल कर्जाऊ स्वरूपात दिले जावे ह्याची समानता श्रमशक्तीशी आहे. कारण भांडवलाचे उपयोगिता मूल्य त्यापासून निर्माण होणाऱ्या विनिमय मूल्यात समाविष्ट आहे. ऋणको व धनको एकाच रकमेला भांडवल समजतात. मात्र ऋणको त्याचा वापर भांडवल म्हणून करीत असतो. तेव्हा त्याला नफा प्राप्त होतो. मार्क्सच्या नुसार व्याज अतिरिक्त मूल्याचा भाग आहे. त्यामुळे तो शोषणाचाच एक भाग आहे. म्हणजे मार्क्सने ह्याला व्याजाचा शोषण सिद्धांत म्हणून संबोधले आहे. व्याज नयाचा अंश आहे. हा अंश वाढण्याची अधिकतम मर्यादा नयाऐवढी आहे. त्याला न्युनतम पातळी नाही. भांडवली व्यवस्थेमध्ये वितरण कोणत्या प्रमाणात होते यावर अतिरिक्त मूल्य म्हणजेच व्याज व नफा अवलंबून असतो. तसेच अतिरिक्त मूल्य खंड आकारणी केलेला वर्ग व वित्त संस्थांच्या प्रगतीवर अवलंबून असतो.

**२) नयाचा दर –**

अतिरिक्त मूल्य व श्रमिकांच्या शोषणाच्या अनुषंगाने भांडवलशाही व्यवस्थेचा महत्त्वाचा पैलू म्हणजे ऱ्हासमान नयाचा दर होय. याचे मूळ कारण भांडवल संचयाच्या प्रक्रियेमध्ये आहे. भांडवल संचयामुळे यांत्रिकीकरण घडून येते. यातून श्रमिकांची उत्पादकता वाढून वस्तूचे उत्पादन वाढते. एकूण भांडवलामध्ये स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढते. ह्यालाच भांडवलाची आंगिक रचना असे म्हटले आहे. यावरून ऱ्हासमान नयाची प्रवृत्ती स्पष्ट होते. ही प्रवृत्ती मार्क्सने पुढील समीकरणाद्वारे स्पष्ट केलेली आहे.

P = S' (1 & q)

वरील समीकरणामध्ये नयाचा दर P दर्शवितो. S' म्हणजे अतिरिक्त मूल्य होय. या सुत्रानुसार अतिरिक्त मूल्यचा दर स्थिर आहे असे मानले तर एकूण स्थिर भांडवल

०.५ वरून ०.७ वाढेल व नयाचा दर घटेल.

P = S' (1 & q)

P = 1 (1 & 0-5)

P = 0-5 म्हणजेच 50%

म्हणजेच ५०:

एकूण स्थिर भांडवलाचे प्रमाण ०.७ पर्यंत वाढले तर

P = S' (¼1 & q)

P = 1 (1 & 0-7)

P = 0-3 म्हणजे 30%

याचा अर्थ उत्पादन प्रक्रियेमध्ये एकूण स्थिर भांडवलाचे (यंत्रे) प्रमाण वाढल्यास नयाचा दर घटतो असे मार्क्सने स्पष्ट केलेले आहे. एकूण स्थिर भांडवलाच्या विरूद्ध दिशेने नयाचा दर बदलतो. तर चल भांडवलाच्या (श्रम) समदिशेने नयाचा दर बदलतो. याचाच अर्थ उत्पादनामध्ये श्रमाचे प्रमाण वाढविल्यास नफा वाढतो. अतिरिक्त मूल्याचा दर आणि भांडवलाची आंगिक रचना नयाच्या दरावर परिणाम करतो. अतिरिक्त मूल्याचा दर आणि भांडवलाचा आंगिक रचनेचे मूल्य वेगवेगळ्या दराने बदलू शकते. ह्यामुळे स्थिर भांडवलाच्या वाढिचे परिणाम नयावर प्रतिकूल होतात. हे परिणाम अतिरिक्त मूल्याच्या दराने रोखले जातात. अतिरिक्त मूल्याचा दर वाढला तर नयाचा दर वाढतो. म्हणून पॉल स्वीझी असे म्हणतात की, ऱ्हासमान नयाच्या दर हा नियम नसून प्रवृत्ती आहे. तर

 ISSN - 2277-3908

रिकार्डोच्या नुसार ऱ्हासमान नयाचा दर भांडवली व्यवस्थेच्या विकासाची मर्यादा आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये नफा घटू नये याकरिता सहा कारकांचा वापर केला जातो. याकरिता स्थिर उत्पादन घटकाच्या किंमती घटविणे, श्रमिकांच्या शोषणाची तिव्रता वाढविणे, श्रममूल्यांपेक्षा वेतन दर कमी देणे, सापेक्ष प्रमाणात लोकसंख्या वाढविणे, अनुकूल आंतरराष्ट्रीय व्यापार आणि व्याजाधिश्टित भांडवलामध्ये वाढ करणे होय.

या सर्व कारकांचा परिणाम असा घडून येतो की, भांडवली वस्तू स्वस्त झाल्या म्हणजे त्यांची उत्पादनामधील संख्या वाढते. यंत्राची संख्या वाढली तरी पूर्वी ऐवढेच श्रमिक काम करतात. परिणामत: अतिरिक्त मूल्य वाढेल व नयाचा दर घटत नाही. श्रमिकांचे कामाचे तास वाढवून शोषणाची तिव्रता वाढविल्या जाऊ शकते. मात्र प्रत्यक्षात जेव्हा कामाचे तास वाढविणे शक्य नसते तेव्हा एकाच श्रमिकाला जास्त यंत्रे सांभाळायला दिली जातात. यामुळे श्रमिक स्वत:च्या वेतनाऐवढे मूल्य पूर्वीपेक्षा कमी वेळात निर्माण करतो. उरलेल्या वेळात अतिरिक्त मूल्य निर्माण करतो. नयाचा दर घटण्याऐवजी वाढतो. अशाप्रकारे श्रमिकाच्या शोषणातून नयाचा दर वाढविण्याची प्रवृत्ती कार्ल मार्क्सने स्पष्ट केलेली आहे.

**बेरोजगारी व विपन्नावस्था –**

यंत्राच्या उपयोगामुळे भांडवली व्यवस्थेमध्ये उच्चावचने घडून येतात. याचा परिणाम बेरोजगारांचा मोठा वर्ग निर्माण होतो. या बेरोजगारांच्या वर्गाला मार्क्सने बेरोजगारांची फौज असे म्हटले आहे. मार्क्सने बरोजगारांची फौज म्हणण्याचा उद्देश असा की, भांडवली व्यवस्थेमध्ये जेव्हा रोजगार वाढतो तेव्हा बेरोजगारांच्या राखीव फौजेतून लोकांना उद्योगामध्ये श्रमिक म्हणून घेतल्या जाते. याउलट मंदी आली तर श्रमिक कामावरून काढून टाकले जातात. परंतु त्यांना बेरोजगाराच्या राखीव फौजेच्या संबंध भांडवली व्यवस्थेतील उच्च वचनांशी आहे. तेजीच्या काळात रोजगारांचे प्रमाण वाढते तर मंदीच्या काळात बेरोजगारांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. मार्क्सच्या नुसार भांडवली व्यवस्थेमध्ये बेरोजगारी असणे हे तिचे लक्षण आहे. अशा स्थितीत श्रमिक रोजगार प्राप्त करण्यासाठी परस्परांमध्ये स्पर्धा करतात. याकरिता कमी वेतन दरावर श्रमिक काम करायला तयार होतात. त्यामुळे रोजगार प्राप्त श्रमिक वेतन वाढीची मागणी करतात त्यांच्या या मागणीला खिळ बसते. श्रमाच्या घटलेल्या वेतन दराचा लाभ उत्पादक वर्गाला (भांडवली वर्ग) मिळतो. ह्यातून अतिरिक्त मूल्य निर्माण करीत असल्यचे स्पष्ट होते. यंत्रामुळे श्रमिक बेरोजगार होतात ही संकल्पना रिकार्डोने स्पष्ट केली होती. ह्याला जोडून वेतन दरामध्ये घट कशाप्रकारे घडून येते ह्याचे विश्लेषण मार्क्सने केलेले आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये वेतन दर आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. यंत्राचा वाढता वापर आणि त्या स्थितीतील रोजगार यामुळे प्रत्यक्षातील लोकसंख्या अतिरिक्त वाटू लागते. यामधून बेरोजगारांची राखीव फौज निर्माण होते. याला मार्क्सने सापेक्ष अतिरिक्त लोकसंख्या असे म्हटले आहे.

वाढत्या यांत्रिक प्रगतीमुळे श्रमिक हे केवळ यंत्राचा सहाय्यक घटक झालेले आहे. त्यामुळे भांडवली व्यवस्थेच्या पूर्वी समाजवादी व्यवस्थेमध्ये दडपलेल्या वर्गाला आपल्या प्रगतीसाठी थोडीफार संधी होती. मात्र भांडवली व्यवस्थेमध्ये श्रमिकांना स्वत:च्या प्रगतीसाठी संधी नाही. ह्यातून श्रमिकांची अवनती घडून येते. यामुळे कमी वेतन दराबर श्रमिकांच्या स्त्रिया आणि मुले उत्पादनामध्ये लावली जातात. यामधून अतिरिक्त मूल्य निर्माण होते. अतिरिक्त मूल्य भांडवल संचयाचे मूलस्त्रोत आहे. वेतन दर कमीजास्त होण्याचा परिणाम आर्थिक अवनतीपेक्षाही मानसिक अवनतीवर अधिक घडून येत असतो.

मार्क्सने श्रम आणि श्रमशक्तीचे वास्तववादी विश्लेषण केलेले आहे. वस्तूचे उत्पादन करताना पर्याप्त श्रमाची आवश्यकता असते. श्रमिकांच्या श्रमाचे सामर्थ्य त्यांच्या शरीरामध्ये आहे. श्रमशक्तीचे उत्पादन श्रमिकांच्या जननदरावर अवलंबून असते. तसेच वस्तूचे उत्पादन देखील श्रमिकांच्या जननदरावर अवलंबून असते. श्रमशक्तीचे मूल्य पैशामध्ये व्यक्त केल्या जाते ज्याला वेतन दर असे म्हणतात. श्रममूल्याची विक्री करून वेतन दर प्राप्त होतात. श्रमिकांच्या राखीव फौजेचा संबंध कृतीशील वेतन दराशी आहे. कायम रोजगाराची मागणी करीत असतांना कमी वेतन दरावर काम करावे लागते. कारण श्रम बाजारामध्ये पुरवठा बाजूला तीव्र स्पर्धा असते. ह्यातून जागतिक भांडवलशाही व्यवस्थेमध्ये नफा मिळविण्याची क्षमता निर्माण होते. ह्याचा संबंध दारिद्र्यकारकतेशी आहे. तसाच श्रमिकांच्या क्रयशक्तीशी व उपभोगातील दुर्बलतेशी आहे.

 ISSN - 2277-3908

**समारोप –**

मार्क्सच्या विवेचनाबाबत अभ्यासक्रमामध्ये मतमतांतरे आहे. मार्क्सच्या विवेचनावर आक्षेप देखील मोठ्या प्रमाणात होण्यात येतात. असे असले तरी अतिरिक्त मूल्य व श्रमिकांचे शोषण या संकल्पनाच्या विवेचनामधील कार्ल मार्क्स यांचे योगदान महत्त्वाचे आहे. अतिरिक्त मूल्याच्या संकल्पनेतून श्रमिकांचे शोषण कसे घडून येते ह्याची शास्त्रीय मांडणी मार्क्सने केलेली आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये भांडवलाच्या आंगिक रचनेतून शोषण कसे घडून येते ही त्याची महत्त्वाची मांडणी ठरते. श्रममूल्य व अतिरिक्त मूल्य संकल्पना मार्क्सच्या विवेचनाच्या गाभा आहेत. नयाचा घटता दर भांडवलाच्या आंगिक रचनेतून घडून येत असल्याचे मार्क्सने स्पष्ट केले आहे. भांडवली व्यवस्थेत श्रमशक्ती ही वस्तू आहे. भांडवली रचनेच्या वाढीतून श्रमाच्या सामाजिक उत्पादकतेत वाढ होत असते.

मार्क्सचे विश्लेषण म्हणजे तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व समाजशास्त्र इत्यादींचे संमिश्रण आहे. त्यामुळे त्याचे अर्थशास्त्रीय विश्लेषण वास्तववादी ठरते. ब्लाग असे म्हणतात की, मार्क्सने आर्थिक जीवनाचे जवळून निरीक्षण करून अर्थशास्त्रीय मांडणी केलेली आहे. मार्क्सने भांडवली व्यवस्थेतील विरोधाभास स्पष्ट केलेले आहे. तांत्रिक बदल, उत्पादन वृद्धी व श्रमिक ह्यामधील आंतरसंबंध स्पष्ट केला आहे. भांडवली व्यवस्थेतील तांत्रिक प्रगती व भांडवल संचय प्रक्रिया मानव कल्याणामध्ये कसे अडथळे निर्माण करते ह्याची सुस्पष्ट मांडणी मार्क्सने केलेली आहे.

**संदर्भ सूची –**


1. खांदेवाले श्री. वी. आणि नेरूरकर, अमरजा (१९८४) : अर्थशास्त्रीय मतप्रणालीचा इतिहास, महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती महामंडळ, औरंगाबाद
2. पानसरे गोविंद (२०१५) : मार्क्सवादाची तोंडओळख, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर
3. Blog Mark (1968) : Economic Therory in Retrospect, Hiemen, Landon.
4. Sweeze Paul (1948) : The Theory of capitalist development.
5- Gauba O. P. ¼2015½ jktuhfr foKku d""k] e;qj isijcSDl] u",Mk
6, Mello Bernard (2017) : Das Kapital Volume - I - 150 Years, Economic & Political Weekly Sept. 16.
7. Vukulab haranam, Vamsi (2017) : Reading Das Kapital in 21st Century Economic & Political Weekly, Sep. 16
8. Basu Deepankar (2017) : The structure and content of Das Kapital Economic & Political Weekly, Sep. 16
9. Vasudevan Rama (2017) : The significant Marx Theory of Money, Economic & Political Weekly Sept. 16